किंमत रु. ५००/-

# वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती “आय” वसई

## गौळवाडा मार्केट

दरपत्रक

सन २०२०-२०२१

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती “आय” वसई अंतर्गत येणाऱ्या गौळवाडा बाजार कर वसुली करणे कामी दरपत्रक मागविण्याबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती “आय” वसई
## दरपत्रक

**कामाचे नाव :- दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/०३/२०२१ या कालावधी करीता वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती “आय”वसई अंतर्गत दैनंदिन घाऊक बाजार फी वसुली करिता ठेका पध्दतीने देणे बाबत.**

दरपत्रक/पुरवठा धारकाचे पुर्ण नाव :- ------------------------------------------------

संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------

------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक :- कार्यालय :- ------------------------------------

:- मोबाईल :- ------------------------------------

(परिशिष्ट-अ)

| कामाचे नाव | किमान देकार रक्कम रुपये | अभिकर्ताने नमुद करावयाचे रक्कम |
|---|---|---|
| ०१/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ या कालावधी करिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय वसई अंतर्गत येणा-या गौळवाडा बाजार फी वसुली ठेका पध्दतीने देणेबाबत. | अपेक्षित रक्कम रुपये<br>१७५४५०/- | रक्कम रुपये (अंकात)---------------<br>रक्कम रुपये (अक्षरी) ---------------<br>------------------------------------<br>------------------------------------ |

दरपत्रक भरणाऱ्या ठेकेदाराची
तारखेसहीत सही व शिक्का

15/1/21.

## अटी व शर्ती

१) विहीत नमुन्यात भरलेली दरपत्रके दोन लखोटयामध्ये दि.२९/०७/२१ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती - आय येथे सिलबंद पेटीत टाकावी मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.

२) सदरील दरपत्रके दि.२६/०७/२०२१ ते दि. २९/०७/२१ दु. ३.०० वाजेपर्यंत स्विकारणेत येतील.

अ) किमान देकार रक्कम -

१. ठेकेदाराने दरपत्रके भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी अनुक्रमांक १चे लिफाफ्यात तांत्रिक बाबीचा व अ.क्र २ चे लिफाफ्यात रक्कम /दर नमुद करावेत. तसेच दरपत्रक फॉर्म फी व किमान देकार रक्कम रु. रोखिने (मॅन्युअल) भरणा करावयाची आहे.

२. दरपत्रक दोन लखोटे पध्दतीने स्विकारण्यात येतील लखोटा १ मध्ये अटी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे नसल्यास दुसरा लखोटे उघण्यात येणार नाही.

३. सदरच्या किमान देकार रक्कमेवर कोणतेही व्याज देय किंवा अनुज्ञेय असणार नाही.

४. दरपत्रक मंजुर होऊन कार्यादेश प्राप्त करतेवेळी मंजुर दरपत्रक धारकास किमान देकार रक्कम भरणा करणे आवश्यक आहे व माहे फ्रेब्रुवारी २०२१ पर्यंत भरणे बंधनकारक राहील. दिलेल्या कालावधीत रक्कम भरणा न केल्यास बाजाराची वसुली करता येणार नाही. तसेच ठेका रद्द करण्यात येऊन आपण भरलेली किमान देकार रक्कम जप्त करण्यात येईल.

५. प्रभाग समिती हद्दीत नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे बाजार बंद झाल्यास महानगरपालिकेकडून नुकसान भरपाई मागता येणार नाही.

६. ना फेरीवाला क्षेत्रामध्ये बसणाऱ्या फेरीवाल्यांना अतिक्रमण विभागाकडून उठविण्यात येईल. अभिकर्त्यास त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

७. बाजार फी वसुली महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार करावयाचे आहे. (दराची माहीती संबंधित प्रभागांच्या सहा.आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध असेल.) निश्चित करुन दिलेल्या दरापेक्षा जादा दराने वसुली केल्यास अगर तशा आशयाची तक्रार आल्यास ठेका रद्द करण्यात येईल, व आपली किमान देकार रक्कम जप्त करण्यात येईल. यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस अभिकर्ता जबाबदार राहील.

८. दैनंदिन बाजार वसुलीसाठी लागणारी पावती पुस्तके ठेकेदारास स्वखर्चाने छपाई करुन पावती पुस्तके महानगरपालिका बाजार विभागामार्फत प्रमाणित करुन घ्यावी लागेल व त्याचाच वापर करावा लागेल.

९. ज्या ठेकेदारास दरपत्रक मंजुर होईल अशा मंजुर दरपत्रक धारकाने जाहीर दरपत्रक सुचनेत नमुद केले प्रमाणे ५०% रक्कम डिमांड ड्राफ्टने जमा करुन करारनाम्यासाठी आवश्यक रक्कमेचे स्टॅम्प पेपर कार्यालयात जमा करुन करारनामा करुन घ्यावा.

१०. बाजार शुल्क वसुली करताना नागरीकांशी, व्यापा-यांशी सौजन्याने वागावे कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. दरपत्रक अटी शर्तीप्रमाणे व मंजुर दाराप्रमाणे काम करण्यास नकार दिला व कामात काही वाद विवाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील, व त्याचे अनुपालन करण्याचे ठेकेदारावर बंधनकारक राहील. या विरुध्द दाद मागत येणार नाही.

१२. वसुलीच्या कामाच्या तपासणीचे अधिकार महानगरपालिकेचे आयुक्त, उप. आयुक्त, सहा आयुक्त हयांना राहील.

१३. अभिकर्त्यास वसुलीकामी नेमणूक केलेल्या व्यक्तीच्या नावाची यादी महानगरपालिकेस देणे बंधनकारक आहे. व वसुली करणाऱ्याचे ओळखपत्र उप. आयुक्त यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

१४. दरपत्रक धारकाने त्या वर्षाच्या कालावधीत ठेक्याची वसुली लागेल. सदरचा ठेका परस्पर दुसऱ्यास हस्तांतर करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद्द करण्यात येईल.

१५. महानगरपालिकेच्या अटी - शर्ती आपणांवर बंधनकारक राहतील व इतर कायद्यातील तरतुदी आपणांवर बंधनकारक राहतील.

१६. सदरील कामाकरिता महानगरपालिका आपणांस कोणतेही मनुष्यबळ, यंत्र, अवजारे, वाहन देणार नाहीत. आवश्यकतेनुसार स्वत:चे साहीत्य व मनुष्यबळ वापरुन सेवा पूर्णपणे उपलब्ध करावयाची आहे.

१७. दरपत्रकेच्या वैध कालावधीमध्ये महानरपालिकेच्या संमतीशिवाय दरपत्रक धारकास त्याची दरपत्रक रद्द करता येणार नाही तथापि तशी परिस्थिती उद्भवल्यास पुर्वग्रह दुषित शिवाय महानगरपालिका ठेकेदाराची किमान देकार रक्कम जप्त करेल व ठेकेदारास दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

१८. जी.एस.टी. भरण्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१९. कोणत्याही ठिकाणी नवीन फेरीवाले बसविण्यास प्रोत्साहित करता येणार नाही. तसे करताना असे निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद्द करण्यात येईल.

२०. कुठलाही ठेकार स्विकारण्याचा / नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचा राहील.

२१. रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

२२. वरील सर्व अटी व शर्तीत बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

अ) पॅनकार्ड

ब) आधारकार्ड

क) जी. एस. टी. प्रमाणपत्र

ड) जी. एस. टी. व शासनाचे इतर कर भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

ई) दर अंकात व अक्षरात, रुपयामध्ये नमूद करावेत.

२३. वरील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आपणांस बंधनकारक असेल अन्यथा ठेका रद्द करण्यात येईल.

उप.आयुक्त (दै.बाजार फी)

वसई-विरार शहर महानगरपालिका